# आपली सृष्टी

भगवंताने आमची सृष्टी रचली आणि आम्हाला आपली सृष्टी रचायची आहे. सृष्टी-सृष्टाने सृष्टी रचन आमच्या हातात सोपविली होती. आम्ही त्यांची ही सुंदर रचना दोन युगांपर्यंत सांभाळली, परंतु आमची शक्ती क्षीण झाल्याने प्रभूची ही सृष्टी माया रावणच्या हातात चालली गेली. आता पुन्हा सर्वशक्तिवान स्वतः आपल्या शक्ती देऊन आम्हाला सृष्टी निर्माणतेचा अधिकार देत आहेत.

मनुष्य आपल्या भाग्याचा स्वतः निर्माता आहे की भाग्य मनुष्याचा निर्माण करते ? यावर हजारो वर्षांपासून दार्शनिकांमध्ये चर्चा होत राहिली. कोणी म्हटले आम्ही स्वतः आपल्या भाग्याचे निर्माते आहोत, तर कोणी म्हटले मनुष्य भाग्याच्या अधीन आहे. भाग्याशिवाय तो काहीच मिळवू शकत नाही. परंतु कोणी तर हेच स्वीकार केले की ईश्वराचे भाग्य-विधाता आहे. चारी युगांमध्ये केवळ एकदाच सृष्टीकर्ता ईश्वर आपल्या सृष्टीत येतो आणि भाग्य बनविण्याचे भाग्य बनवितो आणि मग त्याच भाग्याचा उपभोग तो दोन युगांपर्यंत करतो. त्यानंतर त्याचे कर्मच त्याच्या भाग्याचा निर्माण करतात.

सत्य तर हे आहे की मनुष्याचे कर्मच त्याच्या भाग्याचे निर्माता आहेत. परंतु यात जाणून घेण्यासारखी मुख्य गोष्ट ही आहे की प्रत्येक कर्माचे फळ तात्काळच मिळत नाही. काही कर्मांचेच फळ लगेच मिळते, काहींचे या जीवनात आणि काहींचे पुढच्या जन्मात. कोणत्या जन्मात केल्या गेलेल्या कर्मांचे फळ केव्हा मिळते हे कोणालाच माहीत होत नाही, याच कारणाने भाग्याच्या गुंत्याला समजता येत नाही.

आम्हाला हे स्वीकार करायला पाहिजे की आमच्या बरोबर जे काही होत आहे, त्याचे जिम्मेदार आमचे स्वतःचे कर्मच आहेत. आपल्या परिस्थितींसाठी कोणा दुसऱ्याला दोष देणे यथार्थ नाहीये. जर आपण आपल्या कर्मांना श्रेष्ठ बनविले तर आपल्या कितीतरी परस्थिती बदलू शकतात. आपले श्रेष्ठ कर्म आपल्या पाप कर्मांना सुद्धा समाप्त करतात.

प्रत्येक मनुष्याची आपली आपली सृष्टी आहे. एक पितासुद्धा आपली सृष्टी रचतो आणि ब्रह्माला सुद्धा सृष्टी रचयिता म्हटले जाते. परंतु प्रत्येक मनुष्य आपली सृष्टी दोन प्रकारे रचतो - एक तर संकल्पनांनी व दुसरी....दृष्टीने. म्हणूनच ही म्हण सुद्धा आहे की जशी दृष्टी, तशी सृष्टी.

काही मनुष्यांना ही सृष्टी खूपच दुःखाने भरलेली प्रतीत होते, तर काही लोकांना हे जग पापमय दिसते. काही यास भ्रष्टाचाराची दुनिया म्हणतात तर कोणाला वाटते की येथे कोणीच कोणाचे नाही, येथे सर्व स्वार्थी आहेत, येथे सर्व धोरा देणारे आहेत. अर्थात इथे ज्याने जसा चश्मा घातला, त्याला तसाच संसार दिसतो.

आपण आपल्या दृष्टीला बदलावे म्हणजे ही सृष्टी आपल्याला काही वेगळीच दिसेल. जर आमच्याकडे ईश्वरीय ज्ञान आहे तर आम्हाला हे विश्व एका खेळाप्रमाणे प्रतीत होते. जर आपण गरीब आहोत तर आम्हाला हे विश्व काही वेगळेच दिसून येते. जर आपल्या भावना श्रेष्ठ आहेत तर आम्हाला सर्व चांगले दिसू लागतात आणि जर कोणत्याही कारणाने आपल्या भावना बिघडवल्या आहेत तर आम्हाला हे जग सुनसान दिसेल.

याहून जास्त महत्व आहे आमच्या संकल्पांचे. आपण दुसऱ्यांसाठी व स्वतःसाठी कशी विचारधारा बनविली आहे, त्या अनुसारच या जगात आम्हाला अनुभव होतो. जर आमच्या मनात निराशेने भरलेले विचार येत असतील तर आमची सृष्टी सुद्धा अंधकाराने भरलेली आहे आणि जर आमच्या मनात उमंग-उत्साह आहे तर आम्हाला चहूकडे उजेड दिसून येईल.

जर आमच्या मनात दुसऱ्यांसाठी प्रेम आहे तर आमच्यासाठी दुनिया प्रेमाने भरलेली आहे आणि जर आमच्या मनात वैराचे बीज टपकत असतील तर आम्हाला सृष्टी मोठी कडवट प्रतीत होते.

जर आमचे मन शुभ-भावनांनी भरलेले आहे तर आम्हाला सर्व आपले वाटू लागतात आणि जर आमच्या मनात बदल्याची आग जळत आहे तर आमची सृष्टी तणावपूर्ण आहे.

आपल्या सृष्टीचे निर्माते आपण स्वतः आहोत. जर आपण आपला संसार सुखी बनवू इच्छित आहात तर आपण आपल्या विचारांना, आपल्या दृष्टीला व आपल्या भावनांना महान बनवावे. आपण जसे संकल्प रचतो, त्याचेच प्रकम्पन

चहूकडे पसरून विभिन्न घटनांचे कारण बनतात. आमचे शुद्ध विचार चहूकडे पसरून दुसऱ्यांचा स्नेह घेऊन आमच्याकडे येतात तर आमचे नकारात्मक विचार कित्येक पट नकारात्मक होऊन आमच्या मनाच्या दरवाजात प्रवेश करतात.

आता वेळ आहे आपण ईश्वरीय ज्ञान घेऊन आपल्या दृष्टी व संकल्पांना दिव्य बनवू शकतो व आपल्या कर्मांना सुखदाई बनवू शकतो. असे केल्याने आमची वर्तमान सृष्टी व भावी सृष्टी सुखकारी व स्वर्गिक बनेल.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स
www.bkvarta.com